# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### तळेगांव-दाभाडे (जि.पुणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या वास्तुची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) ५ (१८-०३-२०२०) श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या निधीतून तत्कालीन कामगार नेते जॉर्ज फर्नांडीस यांचे नेतृत्वाखालील म्युनिसिपल मजदूर युनियनतर्फे सन १९९५ मध्ये तळेगांव-दाभाडे येथील डॉ.राम मनोहर लोहिया समाजवादी विद्यापीठाच्या शेजारील जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या नावाने बंगला खरेदी करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.राम मनोहर लोहिया विद्यापीठाच्या नुतनीकरणाचे नावाखाली विद्यापीठ प्रशासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन हा बंगला तोडल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तू तोडल्यामुळे दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी चलो डिलाईल रोड (मुंबई) मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-१२-२०२१) :** (१) तळेगांव-दाभाडे नगरपरिषद कर विभागाची असेसमेंट रजिस्टरची पाहणी केली असता, कडोलकर कॉलनी, प्लॉट क्र. १६३, १७४, १७५ हे राम मनोहर लोहिया विद्यापीठतर्फे शरद जगनाथ राव, सेक्रेटरी ट्रस्टी व श्री.महाबळ शेट्टी मॅनेजिंग ट्रस्टी यांची नावे नोंद असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
(२) सन २००६-०७ कर आकारणीनुसार सदर ठिकाणी तळमजला येथे आरसीसी किचन व स्टोअर तसेच शेजारी पत्र्याचे छप्पर असलेले खुले भोजन कक्ष असून, प्रथम मजल्यावर तीन खोल्या (कामगार निवास) पुढे बंदिस्त मोकळी जागा असल्याचे आढळून येते. सदरची नोंद सन २०१८-१९ च्या असेसमेंटमध्ये देखील तशीच आढळून येते असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.
(३) हे खरे नाही असे गृह विभागाने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व परिसरातील (एम.एम.आर. प्रदेश) गृहनिर्माण क्षेत्राबाबत

**(२) १३०६ (१८-०३-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व परिसरातील (एम.एम.आर. प्रदेश) गृहनिर्माण क्षेत्रातील घरांची निर्मिती आणि विक्री यांच्यातील तफावत सन २०१९ वर्षात कायम असल्याचा अहवाल गृहनिर्माण क्षेत्रातील 'नाइट फ्रँक' या आघाडीच्या मालमत्ता सल्लागार संस्थेने जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई व परिसरातील गृहनिर्माण क्षेत्रात भरभराटी येण्याकरीता शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत तसेच सदर गृहनिर्माण क्षेत्रातील अधोगतीची कारणे काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२७-१२-२०२१) :** (१) व (२) सदरहू अहवाल गृहनिर्माण विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर आणि उपनगरातील सर्वसाधारण नागरी कामे आणि दलित वस्त्यांमधील नागरी कामांचा निधी विनावापर असल्याबाबत

**(३) ४५७५ (१७-०८-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर आणि उपनगरातील सर्वसाधारण नागरी कामे आणि दलित वस्त्यांमधील नागरी कामांसाठी मंजूर रुपये ३५० कोटींच्या निधीचे मा.पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार आमदारांच्या कामांसाठी वाटप करण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांनी सदर कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर उक्त कामाच्या निविदा आणि पुढील कार्यवाहीसाठी मुंबई म्हाडाकडे पाठविण्यात आले होते परंतु, या कामासाठी निविदा काढण्यास शासनाने स्थगिती दिल्यामुळे रुपये ३५० कोटींचा निधी विनावापर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी निविदा काढण्यास स्थगिती देण्याची सर्वसाधारण कारणे काय असून मुंबईच्या वस्त्यांमधील शौचालय, गटारे, संरक्षक भिंत, लादीकरण इत्यादी अत्यावश्यक नागरी कामे पावसाळ्यापूर्वी झाली नाहीत तर नागरिकांना नाहक विविध समस्यांना सामोरे जावे लागणार असल्याने, मुंबईतील लोकप्रतिनीधींनी सर्वसाधारण नागरी कामे व दलित वस्त्यांमधील कामे सुरू करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मुंबई शहर आणि उपनगरातील सर्वसाधारण नागरी कामे आणि दलित वस्त्यांमधील कामांसाठी माहे एप्रिल, २०२० पासून दहा टक्के निधी वितरित केला असून आधीच्या रुपये ३५० कोटीच्या कामांवरील स्थगिती उठविल्याशिवाय नवीन कामे करता येणार नसल्याची स्थिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२९-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३)व (४) कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत उपाययोजना करण्याबाबत निर्गमीत केलेल्या वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांवरील ज्या निविदा प्रक्रिया झाली नाही अथवा कार्यादेश देण्यात आलेले नाही अशी कामे पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आले आहे व वित्त विभागाच्या सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली आहे, असा अहवाल मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील विशेषतः सायन चुनाभट्टी आणि कुर्ला येथील गृहनिर्माण संस्थेत बेकायदेशीररित्या विकासकाची नियुक्ती केल्याबाबत

**(४) ४६४९ (१७-०७-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील हिल रोड परिसरातील अनेक भूखंडांवर विशेषतः सायन चुनाभट्टी आणि कुर्ला-३ (ता.कुर्ला) अंतर्गत न.भू. क्र.२९५ व ३७३ वर असलेल्या श्री गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था या म्हाडा नोंदणीकृत दोन्ही गृहनिर्माण संस्थांचे विधिवत सदस्य नसलेल्या रहिवाश्यांनी सदर गृहनिर्माण संस्थेच्या दिनांक २२ मार्च, २०१४ रोजीच्या पत्रावर संस्थेचे पदाधिकारी म्हणून स्वाक्षऱ्या करुन किंग्ज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स चेंबूर, मुंबई या विकासकाची नेमणूक करून बृहन्मुंबई महानगरपालिकेस पत्रव्यवहार केल्याबाबतची कागदपत्रे झो.पू.प्रा. सादर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही नोंदणीकृत सहकारी संस्थांचे एकत्रिकरण करण्यापूर्वी त्यांच्या स्वतंत्र विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करून पूर्व परवानगी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चुनाभट्टी श्रमिक गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी म्हाडा मंडळ व झो.पू.प्रा. यांना दिनांक ६ जून, २०१९ ते दिनांक ९ जानेवारी, २०२० या कालावधीत अनेक तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बेकायदेशीररित्या झालेली विकासकाची नियुक्ती रद्द करून उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेले संस्थेचे रहिवासी तसेच म्हाडा व झो.पू.प्रा.चे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२८-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

न.भू.क्र.२९५ व न.भू.क्र.३७३ कुर्ला गांव, हिल रोड, सायन चुनाभट्टी (पूर्व) या नावे योजना मे.किंग्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिनांक २०/०६/२०१६ रोजी सादर केलेली सदर योजना दिनांक ०४/०४/२०१९ रोजी स्वीकृत करण्यात आली आहे.
(२) श्री गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. आणि चुनाभट्टी श्रमिक सहकारी संस्था मर्या. या दोन्ही संस्था उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई शहर व पूर्व उपनगरे यांच्याकडे नोंदणीकृत असून या मुद्दयाच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक २४/०७/२०२० रोजी लेखी कळविलेले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, उपरोक्त दोन्ही संस्था त्यांच्या कार्यालयात नोंदणीकृत असून या दोन्ही संस्थांच्या एकत्रीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही त्यांनी प्रस्तावित केलेली नाही, अथवा तशी पूर्व परवानगी दिलेली नाही.
(३) हे खरे नाही.

तक्रारदार श्री.सुभाष गंगाराम पवार व इतर ७ तसेच श्री.चंद्रकांत अमृत भोसले व इतर ५ यांच्या तक्रार अर्जावर उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला-२ यांचे पत्र दिनांक १६/१२/२०१९ जा.क्र.६५ व दिनांक २६/०५/२०२० जा.क्र. ५०८,५०९ अन्वये संबंधित तक्रारदारांना लेखी कळविण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी कुर्ला-२ यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन दिनांक २८/०५/२०२० रोजी परिशिष्ट-२ तयार केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाथरी (जि.परभणी) येथे वरिष्ठस्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत

**(५) ८७१० (११-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २९७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ, मानवत, सेलू व पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील जनतेस पाथरी हे ठिकाण भौगोलिकदृष्ट्या तसेच नागरिकांच्या सोयीचे असल्याने पाथरी येथे वरिष्ठस्तर न्यायालय व अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबतची मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे ई-मेलव्दारे/लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पाथरी येथे न्यायालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-०६-२०२१) :** (१) मा.श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजीचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे सादर केले आहे.

(२) राज्यात न्यायालय स्थापन करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाल्यास, शासन स्तरावर त्याबाबत निर्णय घेण्यात येतो. मा.श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, विधानपरिषद सदस्य यांचे दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२० रोजीचे निवेदन महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले. त्या अनुषंगाने दिनांक १६/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रबंधक, निरीक्षणे-१, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे कळविले आहे की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे स्तरावर गठीत समितीने १) पाथरी, जिल्हा परभणी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव न्यायालय व न्यायिक अधिकारी यांचेसाठी पायाभूत सुविधाच्या अनुपलब्धतेच्या कारणास्तव आणि २) पाथरी, जिल्हा परभणी येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव पुरेशी प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि न्यायालय आणि न्यायिक अधिकारी यांचेसाठी पायाभूत सुविधांच्या अनुपलब्धतेच्या कारणास्तव स्विकारलेला नाही. आता दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजीचे निवेदन पुन्हा महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक २२ जून, २०२१ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (नवी मुंबई) येथील जे.एन.पी.टी. प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन करणेबाबत

**(६) ९०७२ (११-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५६३९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (नवी मुंबई) येथील जे.एन.पी.टी. प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन शासनाने अद्यापही केले नसल्यामुळे सदर गावाच्या पुनर्वसनासाठी नव्याने जमीन उपलब्ध करुन देण्याचे निर्देश

जे.एन.पी.टी. ला देण्याची विनंती मा.मंत्री, केंद्रीय (पोत व परिवहन मंत्रालय) यांना दिनांक ४ मे, २०१७ व दिनांक २९ मार्च, २०१९ रोजीच्या पत्रानुसार करण्यात आल्याचे माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी व बाधित झालेल्या रहिवाशांनी वारंवार तक्रार तसेच धरणे आंदोलन करुनही शासनाने अद्यापपर्यंत त्याची दखल घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे.

हनुमान कोळीवाड्याच्या पुनर्वसनासाठी नव्याने जमीन उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जे.एन.पी.टी. ला देण्याची विनंती मा.मंत्री केंद्रीय (पोत व परिवहन मंत्रालय) यांना दिनांक ०४/०५/२०१७ व दिनांक २९/०३/२०१९ च्या पत्रानुसार करण्यात आली आहे.

(२) व (३) मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २४/११/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये जे.एन.पी.टी. ने हनुमान कोळीवाडा (शेवा कोळीवाडा) चे पुनर्वसन करावयाचे असल्याने पुनर्वसनाचा सकारात्मक प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करुन पाठपुरावा करण्याचे जे.एन.पी.टी. ला निर्देश दिलेले आहेत.

पुनर्वसनाच्या अनुषंगाने उरण तालुक्यातील ३ ठिकाणच्या जागेच्या पाहणी अहवाल उपविभागीय अधिकारी, उरण यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक १७/०३/२०२१ रोजी सादर केला आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १७/११/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये जे.एन.पी.टी. ला मूळ प्रस्तावामध्ये आवश्यक सुचना/ बदल सुचवून पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले असून जिल्हाधिकारी, रायगड व जे.एन.पी.टी. यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर्व विदर्भात मोह पुलावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारण्याबाबत

**(७) ९३६७ (१६-०६-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात मोह फुलांचे उत्पादन होत असून मात्र त्यावर आधारित एकही प्रक्रिया उद्योग या भागात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनोपज असलेल्या मोह फुलावरील साठवणूकीची काही बंधने मोहा फुलामध्ये असणारे औषधी गुणधर्म लक्षात घेता दिनांक ४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास शिथील केली असून मोहा फुलावरील प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्याबाबतच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने निर्णय घेऊन मोहापासून बनविल्या जाणाऱ्या विविध पदार्थांची प्रक्रिया केंद्रे सुरू करुन मोहा फुलाच्या प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१३-१२-२०२१) :** (१) पूर्व विदर्भामध्ये नागपूर, गडचिरोली आणि चंद्रपूर वनवृत्तांचा समावेश आहे. नागपूर वनवृत्तातील गोंदिया वनविभागामध्ये मोहाफुल व इतर गौण वनोपज साठवणुक करणे व मुल्यवर्धन करण्याकरीता शितगृह व गौण वनोपज प्रक्रिया केंद्र उभारण्यात आलेले आहे. उदा. गोंदिया वनविभागातील मौजे गडेगांव येथील प्रक्रिया केंद्र तसेच गडचिरोली वनवृत्तांतर्गत मोहाफुलापासून शरबत व जॅम इत्यादी उत्पादन करण्यात येत असून सिरोंचा वनविभागांतर्गत सिरोंचा येथे मोहाफुलावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच चंद्रपूर वनवृत्तांतर्गत येत असलेल्या मध्य चांदा वनविभागातील मोहाफुलापासून शरबत बनविण्याचे प्रशिक्षण चांदा ते बांदा या योजनेंतर्गत देण्यात आले असून मोहाफुलापासून शरबत बनविण्याचे काम सुरु आहे.

(२) सन २०१७-२०१८ मध्ये विदर्भातील गडचिरोली वनवृत्तातील सिरोंचा वनविभागामध्ये १ प्रक्रिया केंद्र उभारण्याकरीता अनुक्रमे रुपये ५२.०० लक्ष निधी मंजूर केला असून सन २०१८-२०१९ मध्ये नागपूर वनवृत्तातील गोंदिया वनविभागामध्ये १ प्रक्रिया केंद्र उभारण्याकरीता रुपये ५१.४२ लक्ष निधी शासन मंजूरी प्रदान केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे-बंगळूर महामार्गासह नाशिक व सोलापूर महामार्गावरील टोलचे दर वाढविण्यात आल्याबाबत

**(८) ९४६७ (११-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या हद्दीतून जाणाऱ्या पुणे-बंगळूर महामार्गासह नाशिक व सोलापूर महामार्गावरील टोलचे दर दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून ५ टक्क्याने वाढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गाची कामे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने सदर टोल वाढ मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (२३-०६-२०२१)** : (१) पुणे-बंगळूर महामार्गामधील महाराष्ट्राच्या हद्दीतील महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

पुणे शहराच्या हद्दीतून जाणाऱ्या पुणे-बंगळूर महामार्गासह नाशिक व सोलापूर महामार्गावरील टोलचे दर संबंधित प्रकल्पांच्या मंजूर करारनाम्यातील तरतुदींच्या अनुषंगाने व घाऊक किंमत निर्देशांकानुसार (wholesale price index) दरवर्षी वाढविले जातात.

त्यानुसार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांच्या अखत्यारीतील खेड-शिवापूर, आणेवाडी,पाटस, सरडेवाडी, चालकवाडी व हिवरगाव या सहा ठिकाणच्या टोल नाक्यांवरील टोलचे दर दिनांक १ एप्रिल पासून वाढले आहेत. परंतु पुणे-बंगळूर महामार्गावरील प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर यांचे अखत्यारीतील सातारा ते कागल (महाराष्ट्र हद्द) महामार्गावरील किणी व तासवडे या दोन टोल नाक्यांवरील टोलचे दर १ एप्रिल, २०२१ पासून वाढलेले नाहीत, असे संबंधित प्रकल्प संचालक यांनी कळविले आहे.

(२) अनु.क्र.१ मधील उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथे कायमस्वरुपी स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करण्याबाबत

**(९) ९५६४ (१८-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यात अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी व वैद्यकीय महाविद्यालये व कॉम्प्युटर इन्स्टीट्यूट्स असूनही स्पर्धा परीक्षेसाठी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील स्पर्धकांना स्पर्धा परिक्षेसाठी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबादसह विविध जिल्ह्यात जावे लागत असल्याचे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षा स्पर्धकांसाठी अकोला येथे स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करण्याबाबत स्पर्धा परीक्षा उमेदवारांनी व त्यांच्या पालकांनी शासनाकडे मागणी केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला येथे कायमस्वरुपी स्पर्धापरीक्षा केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०७-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व स्पर्धा परीक्षांच्या पूर्व परीक्षा महाराष्ट्रातील सर्व ३७ जिल्हा केंद्रांवर आयोजित करण्यात येतात. या मध्ये अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयांचा समावेश आहे. मुख्य परीक्षेची विद्यार्थी संख्या कमी असल्याने महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी म्हणजेच अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे अशा एकूण ६ जिल्हा केंद्रांवर मुख्य परीक्षा आयोजित करण्यात येतात.
(३) याबाबतचे निवेदन आढळून आले नाही. मात्र निवेदनात अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षा केंद्र असावे अशी मागणी असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांची सदर जिल्ह्यात देखील परीक्षा केंद्र आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) कोणताही विलंब झालेला नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'आर/उत्तर', 'आर/मध्य' व 'आर/दक्षिण' विभागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१०) १०१८२ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'आर/उत्तर', 'आर/मध्य' व 'आर/दक्षिण' विभागातील मोठ्या व लहान रस्त्यांची गत दोन वर्षांपासून देखभाल दुरुस्ती करण्यात आली नसल्याने सद्य:स्थितीत सदर रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने नागरिकांना या रस्त्यांवरून प्रवास करताना गैरसोईचा सामना करावा लागत असल्याची बाब दिनांक २४ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांच्या नूतनीकरणाचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-१२-२०२१) :** (१), (२) व (३) 'आर/उत्तर', 'आर/मध्य' व 'आर/दक्षिण' हे विभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ VII मध्ये येत असून, परिमंडळ VII मधील दोषदायित्व कालावधीत नसलेल्या रस्त्यांच्या देखभालीचे काम तसेच रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम नियुक्त कंत्राटदारामार्फत वेळोवेळी प्राधान्याने करण्यात येते. तसेच दोषदायित्व कालावधीत दुरुस्ती संबंधित असलेल्या रस्त्यांचे परिरक्षण कंत्राटदाराकडून करण्यात येते.

कोरोना विषाणू महामारी व संसर्ग रोगाच्या प्रादुर्भावामुळे रस्ते सुधारणा आणि दुरस्तीच्या नवीन निविदा मागविण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे.

सद्य:स्थितीत 'आर/उत्तर', 'आर/मध्य' व 'आर/दक्षिण' विभागांमध्ये एकूण १३४ मोठे व लहान रस्त्यांची कामे निरीक्षणानंतर रस्त्यांची दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या रस्त्यांपैकी १११ रस्त्यांची कामे निविदा प्रक्रियेमध्ये असून उर्वरित कामे निधी उपलब्धता, प्राधान्यक्रम व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार हाती घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यात केंद्र शासनाचा आदर्श भाडे कायदा लागू न करण्याबाबत

**(११) १०१८९ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र शासनाचा आदर्श भाडे कायदा लागू झाल्यास महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा, १९९९ आणि लिव्ह लायसन्स कायदा रद्द होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्यामुळे भाडेकरूंच्या भाड्याचा दर मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असल्याने एकट्या मुंबईतील १४ हजार ५०० जुन्या चाळीत राहणारे सुमारे २० ते २५ लाख भाडेकरूंच्या हक्कांवर गदा येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाचा आदर्श भाडे कायदा राज्यात लागू करू नये याकरीता बृहन्मुंबई भाडेकरू परिषदेने मुंबई शहरात आंदोलने सुरु केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.जितेंद्र आव्हाड (२७-१२-२०२१) :** (१) केंद्र शासनाचा आदर्श भाडेकरु कायदा राज्यात लागू करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) केंद्र शासनाच्या आदर्श भाडे कायद्यासंदर्भातील बृहन्मुंबई भाडेकरु परिषदेचे आंदोलनाबाबतचे कोणतेही पत्र विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) सद्य:स्थितीत राज्यात अस्तित्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या भाडेपट्टा करारांचे नियमन महाराष्ट्र भाडे नियत्रंण अधिनियम, १९९९ अन्वये प्रभावीरित्या होत आहे. आदर्श भाडेकरु कायद्यातील तरतुदी शासनस्तरावर तपासण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेस एकात्मिक स्वरूपात नियोजन प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्याबाबत

**(१२) १०२०० (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत बृहन्मुंबई महानगरपालिकेसह एमएमआरडीए, म्हाडा, एसआरए, एमआयडीसी, पोर्ट ट्रस्ट अशी इतरही नियोजन प्राधिकरणे असून या प्राधिकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही नियोजन नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्राधिकरणामध्ये पाणीपुरवठा, रस्ते, घनकचरा आदी विविध सेवांचा समावेश होत असून उक्त सेवा ह्या बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुरविण्यात येत असल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राधिकरणे वेगवेगळ्या पध्दतीची असल्याने त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे बृहन्मुंबई महानगरपालिकेस कठीण झाले असल्याने एकजीनसी पध्दतीने कामे होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस एकात्मिक स्वरूपात नियोजन प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस एकात्मिक स्वरूपात नियोजन प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्याबाबत निर्णय प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालयांमधील अग्नीसुरक्षा यंत्रणांमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या असल्याबाबत

**(१३) १०३२२ (२०-११-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ८६१० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिका क्षेत्रातील २८७ पैकी ४५ रुग्णांलयामधील अग्नीसुरक्षा यंत्रणेत अनेक त्रुटी आढळून आल्या असून अग्निशमन नूतनीकरणाचे ९२ रुग्णांलयाचे दाखलेही आरोग्य विभागाकडे आलेले नसल्याचे माहे एप्रिल,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'नर्सिंग होम ॲक्ट' अंतर्गत नोंदणी व नूतनीकरण तसेच अग्निशमन चा ना-हरकत दाखला यासाठीच बहुसंख्य रुग्णालयांनी सुरक्षा यंत्रणा उभारलेली आहे मात्र प्रशिक्षित कर्मचाऱ्यांअभावी रुग्णालयांची अग्निसुरक्षाकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती संबंधित सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०१-२०२२) :** (१) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या एकूण २८७ नोंदणीकृत रुग्णालयांपैकी सन २०२०-२१ मध्ये २६७ रुग्णालयांचे अग्निशमन विभागाच्या ना-हरकत दाखल्याचे प्रस्ताव प्राप्त झाले असल्याचे तसेच, उर्वरित २० रुग्णालयांचे प्रस्ताव अप्राप्त असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

- प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी ४५ रुग्णालयांमध्ये अग्निशमन उपाययोजना करताना राहिलेल्या त्रुटींबाबत रुग्णालयांना कळविण्यात आले आहे.
- नोंदणीकृत २८७ रुग्णालयांपैकी यावर्षी आरोग्य विभागाकडे २१९ रुग्णालयांचे नोंदणी/नुतनीकरण झालेले आहे. तर, उर्वरित ६८ रुग्णालयांचे नोंदणी/नुतनीकरणाचे प्रस्ताव अद्याप आरोग्य विभागाकडे सादर केलेले नसल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) कोविड रुग्णालय आणि इतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना जानेवारी, २०२१ पासून अग्निशमन यंत्रणा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अग्निशमन उपाययोजना करण्यामध्ये त्रुटी राहिलेल्या रुग्णालयांना नोटीसी बजाविण्यात आल्या असून त्रुटींची पुर्तता करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर प्राधान्याने सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाबाबत

**(१४) १०४२७ (२०-११-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील एकूण २० कि. मी. चे रस्ते दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास जळगाव महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले असून या रस्त्यांचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीचा खर्च देखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आला असतानाही जळगाव महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रस्त्यांची दुरुस्ती सोडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांची दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले असल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीनूसार या प्रकरणातील जळगाव महानगरपालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०१-२०२२) :** (१) नाही.

- जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील २० कि.मी. लांबीचे एकूण ०६ रस्ते दिनांक ०६/०३/२००२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जळगाव महानगरपालिकेकडे सुधारणा, दुरुस्ती व देखभालीसाठी वर्ग करण्यात आलेले होते.
- सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक ३१/०३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये, सदर रस्ते अवर्गीकृत करणेबाबत निर्णय घेतला होता.
- मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक ०४/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये, सदर दिनांक ३१/०३/२०१७ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात आला असून, सदर रस्ते पुन्हा पूर्ववत वर्गीकृत करुन, यापुढे संबंधित रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल दुरुस्तीसाठी राहतील असा निर्णय घेतला आहे.
- तथापि, महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर रस्ते ताब्यात देण्याबाबत कार्यवाही झाली नसल्याने, सदर रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत.
- याबाबत महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी बैठक घेऊन, सदर रस्त्यावरील अतिक्रमण महानगरपालिकेमार्फत काढून घेऊन, सदर रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.
- सन २०१७ पासून जळगाव महानगरपालिका हद्दीमध्ये अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा व मलनिस्सारणची कामे सुरु असून, याबाबतच्या शासन निर्णयात नमूद सहा रस्त्यांवर प्रसंगानुरुप किरकोळ दुरुस्ती वगळता कुठलाही मोठ्या प्रमाणात खर्च महानगरपालिकेकडून करण्यात आलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील सहायक नगर रचनाकार व नगर रचनाकार यांनी पदाचा दुरुपयोग केल्याबाबत

**(१५) १०४५३ (०६-१२-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १००४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील सहायक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील तसेच कल्याण विभागाचे नगर रचनाकार श्री.रघुवीर शेळके यांनी बांधकाम व्यवसायिकांशी आर्थिक संगनमत करुन पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी दोषी आढळून आल्याने त्यांचेविरुध्द दिनांक ९ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटिशीच्या अनुषंगाने श्री.रघुवीर शेळके यांनी दिनांक २६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास खुलासा सादर करुनही अदयाप नियमानुसार त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात सहायक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील यांनी नोटिशीवर खुलासा सादर केला आहे काय, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच सहायक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील तसेच कल्याण विभागाचे नगर रचनाकार श्री.रघुवीर शेळके यांच्यावर नियमानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-०१-२०२२)** : (१) श्री.मनोज कुलकर्णी, स्थानिक नागरिक यांनी श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांचे चिरंजीव कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत बांधकाम व्यावसायिक म्हणून काम करण्याबाबत केलेल्या तक्रारीस अनुसरून आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांचा दिनांक ०९/०६/२०२० च्या कारणे दाखवा नोटीशीअन्वये खुलासा मागितला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांनी दिनांक २६/०६/२०२० रोजी त्यांचा खुलासा महानगरपालिका प्रशासनाकडे सादर केला.

श्री.सुनिल पाटील, सहायक नगररचनाकार यांना महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही नोटीस देण्यात आली नसल्याने त्यांचेकडून खुलासा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांचा खुलासा शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी मान्य केला असून, सदरची तक्रार दप्तरी दाखल करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी नगरपालिकेची हद्दवाढ करुन “क” दर्जाच्या महानगरपालिकेत रुपांतर करण्याबाबत

**(१६) १११८६ (२०-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी नगरपालिकेच्या हद्दवाढीकरीता १५ कि.मी. परिघातील १५ ग्रामपंचायतींचा नगरपालिकेत समावेश करून “क” दर्जाच्या महानगरपालिकेत रुपांतर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेत रुपांतर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी चर्चा करून ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रत्नागिरी नगरपालिकेची हद्दवाढ करुन “क” दर्जाच्या महानगरपालिकेत रुपांतर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही. तथापि, रत्नागिरी नगरपरिषदेची हद्दवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून प्राप्त झाला आहे, ही वस्तूस्थिती आहे.

(२) संबंधित ग्रामपंचायतींच्या सरपंच/ ग्रामसेवक यांचेकडून नगरपरिषद हद्दीत समाविष्ट होण्यासाठी संमती ठराव मागविला असून अदयापपर्यंत कोणत्याही ग्रामपंचायतीकडून ठराव प्राप्त झालेला नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

(३) रत्नागिरी नगरपरिषदेची हद्दवाढ करण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साकोली ते भंडारा महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) ११६४५ (२०-११-२०२१) डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली ते भंडारा या राष्ट्रीय महामार्गावर साकोलीपासून तीन किलोमीटर अंतरावरील जांभळी ते मुंडीपार जंगल शिवारातील राष्ट्रीय महामार्गाची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली असून सदर खड्ड्यांमुळे अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर तीन वर्षात आठ जणांचे प्राण या खड्ड्यांमुळे गेले तर १५ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याची दुरस्ती व नुतनीकरण करण्याबाबत अनेक सामाजिक संघटनांनी शासनाकडे मागणी केली केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार साकोली ते भंडारा महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१)** : (१) साकोली ते भंडारा राष्ट्रीय महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या आखत्यारित येतो.

सदर राष्ट्रीय महामार्गावरील खड्डयांची वेळोवेळी दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीयोग्य ठेवण्यात येत आहे. तथापि, पोलीस विभागाकडील दिनांक २१/०९/२०२१ च्या FIR नुसार सदर ठिकाणी पावसाळयातील खड्डयातून निष्काळजीपणे गाडी चालवल्यामुळे स्कॉर्पिओ (चारचाकी) गाडीच्या झालेल्या अपघातात एक जण मृत्यूमूखी व आठ जण जखमी झाल्याची नोंद आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नागपूर यांनी कळविले आहे.
(२) पोलीस विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदर महामार्गावर मागील चार वर्षामध्ये झालेल्या २५ अपघातांपैकी प्रश्न क्र.१ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार झालेल्या अपघातात FIR नुसार एक जण मृत्यूमुखी व आठ जण जखमी झाले असल्याची नोंद आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(३) अशा आशयास अनुसरुन कोणत्याही सामाजिक संघटनेकडून मागणी झाल्याचे दिसून येत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(४) साकोली ते भंडारा महामार्गाची नियमितपणे आवश्यक दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच सद्य:स्थितीत सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम दिनांक ०८/११/२०२१ पासून हाती घेण्यात आले आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टिळकनगर, चेंबूर (मुंबई) म्हाडाच्या इमारत पुनर्विकास प्रकल्पात अनियमितता झाल्याबाबत

**(१८) ११६५७ (२०-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या इमारत क्र. १२०, टिळकनगर, चेंबूर, मुंबई येथील पुनर्विकास इमारतीत राधामाधव संस्थेने मे.मिलेनिअम डेव्हलपर्स या विकासकासोबत नोंदणीकृत केलेला करार बेकायदेशीरपणे रद्द करून मे.एन.एच.कॉर्पोरेशन व श्री सिद्धिविनायक क्लासिक कंस्ट्रक्शन प्रा.लि. (रुपारेल रिअल्टी) यांच्याशी सहभागीदारीमध्ये दुसरा करार केला असल्याची बाब दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.मिलेनिअम डेव्हलपर्स यांचा करार रद्द करण्यात आल्यानंतरही या पुनर्विकास इमारतीत सदनिका मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी गुंतविलेली रक्कम आजतागायत त्यांना परत देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित लाभार्थ्यांनी म्हाडा प्राधिकरणाकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी लाभार्थ्यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीनूसार सदर प्रकरणी लाभार्थ्यांनी गुंतविलेली रक्कम त्यांना परत मिळवून देण्याबाबत तसेच या पुनर्विकास प्रकल्पात अनियमितता करणाऱ्या संबंधित विकासकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) टिळकनगर, चेंबूर येथील इमारत क्र. १२०, राधामाधव सह. गृह. संस्था या संस्थेने पुनर्विकासाकरीता दिनांक ३१/१२/२०१० रोजी विकासक मे.मिलेनियम डेव्हलपर्स यांच्यासोबत नोंदणीकृत विकास करारनामा केलेला होता. परंतु, विकासकाने सदरहू संस्थेच्या

पुनर्विकासाकरीता पुढील काहीच कार्यवाही न केल्यामुळे संस्थेने दिनांक १८/०९/२०१४ रोजीच्या संस्थेच्या सर्वसाधारण सभेमधील निर्णयानुसार विकासक मे. मिलेनियम डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द केलेली आहे.

तद्नंतर, संस्थेने दिनांक ०९/०२/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये विकासक मे.एन.एच. कॉर्पोरेशन यांची विकासक म्हणून नियुक्ती केली. परंतु, मे.एन.एच. कॉर्पोरेशन यांनी देखील संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकास कामामध्ये असमर्थता दर्शविल्याने संस्थेने दिनांक ०९/०२/२०१५ रोजीच्याच सर्वसाधारण सभेमध्ये नवीन विकासक म्हणून श्री सिद्धीविनायक क्लासिक कंस्ट्रक्शन प्रा.लि. (रूपारेल रिअल्टी) यांची नियुक्ती केली व त्यांच्यासमवेत दिनांक १५/०५/२०१८ रोजी नोंदणीकृत विकास करारनामा केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी संबंधित लाभार्थ्यांनी म्हाडा प्राधिकरणाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने राधामाधव सह. गृह. संस्था तसेच विकासक मे. मिलेनियम डेव्हलपर्स यांच्याकडून म्हाडाने खुलासा मागविला आहे. त्यापैकी उक्त संस्थेने त्यांचा खुलासा मुंबई मंडळास दिनांक १६/११/२०२१ रोजी सादर केलेला आहे. तसेच संस्थेने सदर खुलाश्याची प्रत संबंधित लाभार्थ्यांना पाठविलेली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरू आहे.

---

## कोस्टल रोडमुळे बाधित होणाऱ्या स्थानिक मच्छिमार बांधवांच्या मागणीबाबत

**(१९) ११६७३ (०६-१२-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या कोस्टल रोडच्या दोन खांबामधील अंतर फक्त ६० मीटर इतकेच ठेवले असल्याने या ठिकाणी मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमार बांधवांना त्यांच्या नौका ये-जा करणे शक्य होणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अंतर हे २०० मीटर करावे अशी मागणी तेथील स्थानिक मच्छिमार बांधवांनी मागील दहा दिवसांपासून वरळी येथे आंदोलनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कोस्टल रोडमध्ये बाधित होणाऱ्या मच्छिमार बांधवांच्या सुरु असलेल्या आंदोलनावर चर्चा करण्यासाठी व सदर प्रश्नावर मार्ग काढेपर्यंत सदरचे काम बंद करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतचा तोडगा काढण्यात आला नसल्याने सदर कोस्टल रोडमध्ये बाधित होणाऱ्या मच्छिमार बांधवाना न्याय मिळवून देण्याकरीता शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-१२-२०२१) :** (१) भारतीय मानक क्रमांक ४६५१ मधील तरतुदींनुसार तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डनुसार इंडियन वॉटरवेज ॲथोरिटी ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दोन खांबांमधील ६० मीटर अंतर वरळी येथील मच्छिमार नौका ये-जा करण्यासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक आहे, तसेच महाराष्ट्र कोस्टल विभाग व्यवस्थापन प्राधिकरणाच्या तज्ञानुसार देखील सदर ६० मीटर अंतर हे चार मार्गिका बोट वाहतुकीसाठी पुरेल इतके असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) बाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंबंधीची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु करण्यात आली आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरीवली, चिकूवाडी परिसरातील आरक्षित भूखंडावर क्रीडा संकुलचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ४७४८१ (१२-०७-२०१९) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम उपनगरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सांस्कृतिक कार्यक्रमासाठी क्रीडा संकुल उभारण्यासाठी बोरीवली (मुंबई) चिकूवाडी परिसरातील आरक्षित भूखंडावर क्रीडा संकुलचा प्रस्ताव सन २००९ मध्ये महानगरपालिका सभागृहाने मंजूर करून मान्यतेसाठी नगरविकास विभाग व राज्य शासनाची मान्यता मिळण्यासाठी सादर केलेला असतानाही आजमितीस सदरहू प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची मान्यता मिळण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बोरीवली येथील क्रीडा संकुलास विनाविलंब मान्यता मिळून क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०१-२०२२) :** (१) ते (३) शासनाने दिनांक ०८/०५/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे बृहन्मुंबई विकास योजना २०३४ (सारभूत स्वरूपाचे फेरबदल वगळून) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला मंजुरी दिली असून ती दिनांक ०१/०९/२०१८ पासून अंमलात आलेली आहे. सबब, २००९ च्या तत्कालीन प्रस्तावानुसार सध्या अंमलात नसलेल्या विकास योजना-१९९१ मध्ये, आता फेरबदल करणे अभिप्रेत नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ नुसार प्रसिध्द केलेल्या प्रारूप आराखड्यानुसार तसेच कलम ३० अन्वये महापालिकेकडून शासनास मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रारूप आराखड्यामध्ये

बोरीवली, चिकूवाडी, मौजे एक्सर येथील न.भू.क्र.३७४/बी/६ हा भूखंड 'महानगरपालिका क्रीडा संकुल' म्हणून प्रस्तावित करण्यात आला होता.तथापि, विकास आराखडा २०३४ अंतिमतः मंजूर करतेवेळी सदर भूखंडावरील आरक्षण 'महानगरपालिका क्रीडा संकुल' एवजी 'क्रीडांगण' असे करावे, अशी विनंती महापालिकेने दिनांक ०३/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३१(१) अन्वये मंजूर केलेल्या विकास योजना आरखडा २०३४ नुसार अंतिम मंजुरी देताना महापालिकेने केलेली विनंती ही सारभूत स्वरुपाची असल्याने सदर भूखंडावरील 'महानगरपालिका क्रीडा संकुल' हे आरक्षण बदलून 'क्रीडांगण' हे आरक्षण ई.पी. मध्ये दर्शवण्यात येऊन हरकती/सूचनांसाठी प्रसिध्द करण्यात आले.

शासनाच्या दिनांक ०८/०५/२०१८ च्या अधिसूचनेतील परिशिष्ट ब प्रमाणे सदर भूखंड हा EP-RC-१२६ मध्ये समाविष्ट आहे. त्यानुसार सदर भूखंडावरील 'ROS २.४ Municipal Sports Complex' हे आरक्षण बदलून 'ROS १.४-Playground' असे आरक्षण ई.पी. द्वारे दर्शवण्याचे प्रस्तावित आहे. बृहन्मुंबई विकास योजनेतील ई.पी. प्रस्तावांवर नियुक्त अधिकारी यांनी प्राप्त हरकत व सूचनांवर सुनावणी देऊन व आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करून अहवाल सादर केला असून संचालक, नगररचना यांचे स्तरावर सदर सारभूत स्वरूपाचे फेरबदलांवर छाननी सुरु आहे. नगर रचना संचालनालयाकडून सदर ई.पी. प्रस्तावाबाबत अभिप्राय प्राप्त झालेनंतर त्यावर शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) अशी बाब नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.